महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ❖ ०८ एप्रिल २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २८०❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# सायबर प्रयोगशाळांचे जाळे सक्षम करा

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई शहरातील तीन सायबर प्रयोगशाळांचे उद्घाटन मुंबई, 7 एप्रिल (हिं.स.) सायबर गुन्हेगारीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यासाठी सायबर गुन्ह्यांमधील तपासात सायबर प्रयोगशाळा महत्वाची भूमिका बजावणार आहे. आमच्याबद्दल मदत त्यासाठी शासन प्रयोगशाळा निर्माण करीत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सायबर प्रयोगशाळांचे जाळे अधिकाधिक सक्षम करण्याच्या सूचनाही उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दक्षिण मुंबई विभागाच्या निर्भया सायबर प्रयोग शाळेचे डी. बी. नगर पोलीस स्टेशन येथे उद्घाटन करण्यात आले. 1 राजनीति यासोबतच मुंबई (मध्य) भागासाठी वरळी पोलीस स्टेशन येथील व मुंबई (पूर्व) भागासाठी गोवंडी पोलीस स्टेशन येथील सायबर प्रयोगशाळांचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, अप्पर मुख्य सचिव (गृह) इक्बाल सिंह चहल, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती आदींसह पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुंबई शहरात पाच सायबर प्रयोगशाळा प्रस्तावित आहेत. यापैकी तीन प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

या प्रयोगशाळांच्या माध्यमातून विशेषत्वाने सायबरच्या माध्यमातून महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे गुन्हे कमी कालावधीत सिद्ध करता येणार आहे. तसेच गुन्हा लपवण्यासाठी किंवा पुरावा नष्ट करण्यासाठी आमच्याबद्दल मदत कुठल्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणातील डाटा डिलीट केल्यास, मोबाईलची तोडफोड केल्यास किंवा मोबाईल टेम्पर केल्यास अशा सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधील सर्व डेटा आधुनिक संगणक प्रणालीच्या सहाय्याने रिकव्हर' केला जाणार आहे. प्रयोगशाळा आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून अद्ययावत संगणक प्रणालीने (सॉफ्टवेअर) सक्षम आहेत. जगातील या क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान या प्रयोगशाळांमध्ये उपयोगात आणले जाणार आहे. आर्थिक गुन्हेगारी संदर्भात ऑनलाईन पद्धतीने परस्पर पैशांची हेराफेरी करणे, बँक खाते हॅक करणे अशा पद्धतीच्या गुन्ह्यांवरही प्रयोगशाळेच्या माध्यमातून नियंत्रण मिळविण्यात येणार आहे.

# कार चालकाची हत्या अन प्रेमी युगुल फरार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई उलवे भागात राहणाऱ्या सुरेंद्र आसाराम पांडे या चालकाची हत्या केल्यानंतर त्याची कार घेऊन पळून गेलेल्या 19 वर्षीय तरुणी आणि तिचा प्रियकर संगमनेर पोलिसांच्या हाती लागल्याची घटना उघडकीस आली आहे. संगमनेर पोलिसांकडुन याबाबतची माहिती मिळाल्यानंतर उलवे पोलिसांनी सुरेंद्र पांडे याच्या घरात जाऊन पाहणी केल्यानंतर त्याचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळुन आला. त्यानंतर उलवे पोलिसांनी या हत्या प्रकरणातील तरुणी रिया दिनेश सरकल्याणसिंग (19) आणि तिचा प्रियकर विशाल संजय शिंदे (21) या दोघांना अटक केली आहे. शरीर सुखाची मागणी करत असल्याने हत्या केल्याचे दोघांनी सांगितले.

या घटनेतील मृत सुरेंद्र पांडे हा मुळचा उत्तरप्रदेश राज्यातील प्रयागराज येथील रहिवासी असून सध्या तो उलवे सेक्टर-24 मधील मोहागाव येथील क्रियांश रेसीडेन्सी इमारतीत एकटाच राहत होता. तसेच तो ओला कार चालवून आपला उदरनिर्वाह चालवत होता. महिन्याभरापुर्वी सुरेंद्र पांडे याची आरोपी तरुणी रिया सरकल्याणसिंग हिच्यासोबत ओळख झाली होती. मुळची पंजाब राज्यातील रिया ही नोकरीच्या शोधात असल्याने सुरेंद्र पांडे याने तिला नोकरीसाठी मदत करण्याचे आश्वासन देऊन तिला आपल्या घरामध्ये आसरा दिला होता. तेव्हांपासून रिया सुरेंद्र पांडे याच्या घरामध्ये राहत होती.

# सर्वसामान्यांना महागाईचा फटका

## पेट्रोल-डिझेलची दरवाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता नवी दिल्ली : सर्वसामान्यांना महागाईचा आणखी एक दणका बसण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारच्या महसूल विभागाने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात (एक्साइज ड्यूटी) प्रति लिटर २ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत २ रुपयांनी वाढ होण्याची शक्यता आहे. नवे दर आज मध्यरात्री १२ वाजेपासून लागू होणार आहेत. सध्या दिल्लीत पेट्रोलची किंमत ९४ रुपये प्रति लिटर आणि डिझेलची किंमत ८७ रुपये प्रति लिटर आहे. या नव्या वाढीनंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात थेट वाढ होईल. आतापर्यंत सरकार पेट्रोलवर १९.९० रुपये आणि डिझेलवर १५.८० रुपये प्रति लिटर उत्पादन शुल्क आकारत होते. आता ही वाढ झाल्याने पेट्रोलवरील शुल्क २१.९० रुपये आणि डिझेलवरील शुल्क १७.८० रुपये प्रति लिटर होणार आहे.

पेट्रोल-डिझेलच्या किमती कशावर अवलंबून? पेट्रोल आणि डिझेलच्या किमती ठरविण्यासाठी चार मुख्य घटक महत्त्वाचे ठरतातः - कच्च्या तेलाची आंतरराष्ट्रीय किंमत



- रुपयाच्या तुलनेत अमेरिकन डॉलरचे मूल्य -केंद्र आणि राज्य सरकारांचे कर - देशातील इंधनाची मागणी भारतात पेट्रोल-डिझेलचे दर कसे ठरतात? जून २०१० पर्यंत पेट्रोलचे दर सरकार ठरवत असे आणि दर १५ दिवसांनी त्यात बदल होत असे. मात्र, २६ जून २०१० पासून सरकारने पेट्रोलच्या किमती निश्चित करण्याची जबाबदारी तेल कंपन्यांवर सोपवली. त्याचप्रमाणे, ऑक्टोबर २०१४ पर्यंत डिझेलचे दरही सरकार ठरवत होते. १९ ऑक्टोबर २०१४ नंतर डिझेलचे दर ठरविण्याचे अधिकारही तेल कंपन्यांना देण्यात आले. सध्या तेल कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाची किंमत, विनिमय दर, कर, वाहतूक खर्च आणि इतर बाबींचा विचार करून दररोज पेट्रोल आणि डिझेलच्या किमती जाहीर करतात. या नव्या शुल्कवाढीमुळे वाहनचालकांसह सर्वसामान्यांचे बजेट कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# नर्सिंग अभ्यासक्रमाच्या नावाखाली विद्यार्थ्यांची फसवणूक

## ठाणे स्थानक परिसरातील संस्थेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : नर्सिंग (परिचारिका) अभ्यासक्रमाच्या नावाखाली २३ विद्यार्थ्यांची ३३ लाख १७ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्यांना निकालपत्र दिली नाही. तसेच विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्र देखील परत केलेली नाहीत. याप्रकरणी उडाण स्कील इन्स्टिट्यूट या संस्थेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील एका इमारतीमध्ये २०२१ मध्ये उडाण स्कील इन्स्टिट्यूट ही संस्था सुरू होती. या संस्थेचे मालक राहुल झा, सौरभ सांदिलिया यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल आहे. विद्यार्थ्यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, इयत्ता १२ वीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थांनी विविध अभ्यासक्रमासाठी शोध सुरु केला होता. त्यावेळी त्यांना समाजमाध्यमावर उडाण स्कील इन्स्टिट्यूट या संस्थेची जाहिरात दिसली. अनेकांनी या संस्थेत परिचारिका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असल्याचे भासवून विद्यार्थ्यांकडून संस्थेने लाखो रुपयांचे शैक्षणिक शुल्क घेतले होते. या अभ्यासक्रमात सरकारी प्रमाणपत्र दिले जाते असेही सांगितले होते.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांचे १० वी आणि १२ वी इयत्ता उत्तीर्णचे प्रमाणपत्र, गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला संस्थेने स्वत:कडे ठेवले होते. मे २०२४ मध्ये विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाची परिक्षा दिली. या परिक्षेचा निकाल डिसेंबर २०२४ मध्ये लागणार असल्याचे सांगितले होते. डिसेंबर महिन्यात विद्यार्थ्यांना परिक्षेचा निकाल हाती मिळाला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी याबाबत संस्थेच्या अधिकाऱ्यांना विचारले असता, त्यांनी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल नोदंणीसाठी २० हजार रुपये लागतील असे सांगितले. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी २० हजार रुपये संस्थेतील अधिकारी सौरभ याच्या बँक खात्यात जमा केले. परंतु त्यानंतरही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले नाही. याबबत विद्यार्थ्यांनी संस्थेच्या अधिकाऱ्यांना विचारले असता, त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली.

फसवणूक होत असल्याने काही विद्यार्थ्यांनी संस्थेच्या कार्यालयात जाऊन विचारणा करण्याचा निर्णय घेतला. परंतु संस्थेला टाळे लागले होते. विद्यार्थ्यांनी संस्थेतील अधिकारी सौरभ सांदिलिया याला संपर्क साधला. त्याचा मोबाईल क्रमांक बंद होता. त्यानंतर त्यांनी संस्थेचा मालक राहुल झा याला संपर्क केला. परंतु त्याचाही मोबाईल क्रमांक बंद होता. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आतापर्यंत २३ विद्यार्थ्यांनी तक्रार दाखल केली असून त्यांची ३३ लाख १७ हजार ८५० रुपयांना फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.



# मोरोशी प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार राम भरोसे



आदिवासी रुग्णांना घ्यावे लागतात खाजगी रुग्णालयाचे उपचार

प्रशासनाची फक्त मलमपट्टी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील मोरोशी प्राथमिक आरोग्य केंद्रात फांगुळगव्हाण येथील आदिवासी शेतमजूर गणपत कारभाळ हे पोटात जबरदस्त दूखु लागल्याने, तसेच उलटी जुलाब सुरू झाल्याने ते प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोशी येथे गेले. परंतु येथे ना डॉक्टर, ना कोणी आरोग्य कर्मचारी!अखेर त्रास वाढल्याने रुग्णाला डॉ भेरे यांच्या खाजगी दवाखान्यात भर्ती करण्यात आले, त्यामुळे या पेंशट चा जीव वाचला, त्यामुळे मुरबाड तालुक्यातील आरोग्य विभागाचा सावळागोंधळ पुन्हा एखाद्या समोर आला आहे.

विशेष म्हणजे, ठाणे जिल्हा परिषदेचे कर्तव्यनिष्ठ मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी कल्याण तालुक्यातील निळजे पीएससीला अचानक भेट दिली होती, यानंतर तेथील कर्मचारी गायब असल्याचे दिसून आल्याने त्यांनी या ५तेड्कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते, यामुळे संपूर्ण जिल्ह्यात, आरोग्य विभागात खळबळ उडाली होती, यामुळे आरोग्य विभाग अलर्ट झाला होता, असे असताना कालच फांगुळगव्हाण येथील गणपती कारभाळ (४०)हे पोटाच्या व उलटी, जुलाब च्या आजाराने त्रस्त झाल्याने ते मोरोशी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल झाले, मात्र हे केंद्र उघडे होते, परंतु या दवाखान्यात ना डॉक्टर, ना नर्स, ना आरोग्य कर्मचारी!श्री कारभाळ हे बाहेर उलट्या करत होते, तडफडत होते. परंतु कोणीच नसल्याने अखेरीस त्यांचा मुलगा किरन कारभाळ याने त्यांना मोरोशी येथीलच डॉ भेरे यांच्या खाजगी दवाखान्यात भर्ती केले. व त्यांचा जीव वाचला,

मुरबाड तालुक्यात९प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत, तर ३०उपकेंद्रे असून मोरोशी अंतर्गत, सावरणे, चिंचवाडी, फांगुळगव्हाण, निरगुडपाडा, वाघवाडी, न्याहाडी, पायरवाडी, कुंभाले, वैतागवाडी, वाल्हीवरे, मोंधळवाडी, धारखिंड, आल्याची वाडी, बांडिशेत, लोत्याची वाडी, अवळेवाडी,दिवाणपाडा, भोंराडे, करपडवाडी, फांगणे, भोईरवाडी आणि पेजवाडी, अशी २५ते ३०गावपाडे येतात, हे सर्व आदिवासी समाज असून यांच्या कडे लक्ष द्यायला कोणालाही वेळ नाही, हे आदिवासी, जंगलात राहणारे, यांना काय उपचार करायचे? असे हिणवून दुर्लक्ष केले जाते.

नुकतेच पुणे जिल्ह्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयातील प्रकारामुळे आरोग्य विभागाची बेअब्रू झाली आहे, अशातच शासकीय रुग्णालये,ग्रामीण रुग्णालये,प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे, यांची अशी परिस्थिती असेल तर जिल्हाची आरोग्य यंत्रणा नक्कीच आयसीयूमध्ये आहे की काय? असा प्रश्न उपस्थित होतो.

# अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरण

## पोलीस अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचे हायकोर्टाचे आदेश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणात राज्य सरकारला हायकोर्टाने मोठा धक्का देत या प्रकरणात पोलिसांवार गुन्हा दाखल करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहे. या प्रकरणात अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर करणाऱ्या अधिकाऱ्यांवार गुन्हा दाखल करणार नाही अशी भूमिका राज्य सरकारने घेतली होती मात्र आता मुंबई हायकोर्टाने दिलेल्या आदेशानंतर पोलिसांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याने राज्य सरकारला एक मोठा धक्का मानला जात आहे.

अक्षय शिंदे याचा मुंब्रा परिसरात चौकशीसाठी आणताना एन्काऊंटर करण्यात आला होता मात्र हे एन्काऊंटर बनावट असल्याचा तपासात समोर आल्याने पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती मात्र याच्या विरोधात राज्य सरकारने भूमिका घेत जोपर्यंत एसआयटी अहवाल येत नाही तोपर्यंत गुन्हा दाखल होणार अशी भूमिका सरकारने घेतली होती. तर दुसरीकडे या सरकारच्या या भूमिकेवर हायकोर्टाने नाराजी व्यक्त करत आज या प्रकरणाचा निकाल देत मुंबई पोलीस सहआयुक्त (गुन्हे) लखमी गौतम यांना संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहे. तसेच या प्रकरणाचा पुढील तपास मुंबई पोलिसांना देण्याचे आदेश देखील हायकोर्टाने दिले आहे. या आदेशानंतर आता पुढील दोन दिवसात या प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यात येणार आहे आणि स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीला या प्रकरणात संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा लागणार आहे.

अक्षय शिंदे याचा मुंब्रा परिसरात चौकशीसाठी आणताना एन्काऊंटर करण्यात आला होता मात्र हे एन्काऊंटर बनावट असल्याचा तपासात समोर आल्याने पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती मात्र याच्या विरोधात राज्य सरकारने भूमिका घेत जोपर्यंत एसआयटी अहवाल येत नाही तोपर्यंत गुन्हा दाखल होणार अशी भूमिका सरकारने घेतली होती. तर दुसरीकडे या सरकारच्या या भूमिकेवर हायकोर्टाने नाराजी व्यक्त करत आज या प्रकरणाचा निकाल देत मुंबई पोलीस सहआयुक्त (गुन्हे) लखमी गौतम यांना संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहे. तसेच या प्रकरणाचा पुढील तपास मुंबई पोलिसांना देण्याचे आदेश देखील हायकोर्टाने दिले आहे. या आदेशानंतर आता पुढील दोन दिवसात या प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यात येणार आहे आणि स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीला या प्रकरणात संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा लागणार आहे.

चौकशीसाठी जाताना मुंब्रा येथे अक्षयने पोलिसांची बंदूक हिसकावून पोलिसांवर 2 गोळया झाडले तेव्हा पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी अक्षयवर तीन गोळया झाडले असल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला होता.

# स्वत:वर गोळी झाडून आयुक्तांचा जीवन संपवण्याचा प्रयत्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

लातूर : स्वतः वर गोळी झाडून घेऊन जीवन संपविण्याचा प्रयत्न केलेले लातूर महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यावर रविवारी पहाटे तब्बल साडेतीन तास शस्त्रक्रिया करण्यात आली. ते उपचाराला प्रतिसाद देत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. दरम्यान, अधिक उपचारांसाठी आयुक्त मनोहरे यांना आज सकाळी एयरलिफ्ट करून मुंबईला हलविण्यात आले. यासाठी शहरात साडेदहा वाजेच्या दरम्यान, सह्याद्री हॉस्पिटल ते एयरपोर्ट दरम्यान ग्रीन कॉरिडॉर करण्यात आले. आयुक्त मनोहरे यांनी शनिवारी रात्री ११.१५ वाजेच्या सुमारास बार्शी रोडजवळील शासकीय निवासस्थानी स्वतःच्या डोक्यात बंदुकीने गोळी झाडली होती. उजव्या कानशिलाच्या बाजूने गोळी डाव्या दिशेने आरपार गेली. घटनेच्या वेळी पत्नी, दोन लहान मुले, सुरक्षा रक्षक घरात होते. आवाज ऐकून सुरक्षा रक्षक, कुटुंबीयांनी धाव घेतली. आयुक्तांच्या पत्नीने वसमत येथे सासऱ्यांना माहिती दिली. त्यांनी तत्काळ चालक हकानी शेख यांना फोन करून घरी जाण्यास सांगितले. अगदी पंधरा ते वीस मिनिटांत आयुक्तांना जखमी अवस्थेत सह्याद्री रुग्णालयात दाखल करण्यात आले. महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी स्वतःवर बंदुकीने गोळी का झाडून घेतली, याचे कारण अद्यापि पोलिस दप्तरी नोंदविलेले नाही. पोलिस कुटुंबीयांशी बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत.



# गीतासार



### अध्याय ७
## ज्ञानविज्ञानयोगः

श्रीभगवानुवाच मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः । असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ ७-१ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), अनन्य प्रेमाने मन माझ्या ठिकाणी आसक्त करून तसेच अनन्य भावाने माझा आश्रय घेऊन, योगयुक्त होऊन तू ज्यायोगे संपूर्ण विभूती, शक्ती, ऐश्वर्यादी गुणांनी युक्त, सर्वांचा आत्मा असणाऱ्या मला निःसंशयपणे जाणशील, ते ऐक. ॥ ७-१ ॥

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः । यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ ७-२ ॥

मी तुला विज्ञानासह तत्त्वज्ञान संपूर्ण सांगेन, जे जाणले असता या जगात पुन्हा दुसरे काहीही जाणावयाचे शिल्लक राहात नाही. ॥ ७-२ ॥

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ ७-३ ॥

हजारो मनुष्यांमध्ये कोणी एखादा माझ्या प्राप्तीसाठी प्रयत्न करतो आणि त्या प्रयत्न करणाऱ्या योग्यांमध्येही एखादाच मत्परायण होऊन मला खऱ्या स्वरूपाने जाणतो. ॥ ७-३ ॥

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च । अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ७-४ ॥

पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी, आणि अहंकार अशी ही आठ प्रकारात विभागलेली माझी प्रकृती आहे. ॥ ७-४ ॥

# आरोग्य
## ब्रेन फ्लॉसिंग म्हणजे काय?

मानसोपचारतज्ज्ञांच्या मते ब्रेन फ्लॉसिंग ही मानसिक आरोग्याची एक स्थिती आहे जी तुमचे मन स्वच्छ करण्याच्या कल्पनेने प्रेरित आहे. यासाठी आजच्या अशांत, सतत बदलणाऱ्या वातावरणात, ८डी ऑडिओ खूप मदत करू शकतो.

### काय असतो ८ डी आवाज?

८ डी म्हणजे ८ दिशांनी येणारा आवाज. यामध्ये, संगीत ऐकताना तुम्ही दुसऱ्याच जगात हरवून जाता. ८डी ऑडिओमुळे असे वाटते की संगीत एका कानातून दुसऱ्या कानात वाहू लागले आहे किंवा तुमच्या डोक्याभोवती फिरत आहे, ज्यामुळे तुम्ही तुमच्या मेंदूतील नको असलेल्या गोष्टी काढून टाकत आहात अशी भावना निर्माण होते.

८डी ऑडिओ हा ऑडिओ इंजीनिअरींगचा एक प्रकार आहे, जो ऐकण्याचा अनुभव अधिक समृद्ध करतो, जिथे तुमच्या आजूबाजूला आवाज येत असल्यासारखे जाणवते. हे मेंदूच्या दोन्ही गोलार्धांना सक्रिय करते, ज्यामुळे विश्रांती मिळते.

### ब्रेन फ्लॉसिंग कसे करायचे?

तज्ज्ञांच्या मते, ब्रेन फ्लॉसिंग करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे ८डी ऑडिओ कंटेंट आणि ट्रॅक निवडणे, जे ऑनलाइन म्युझिक ॲप्सवर सहज उपलब्ध आहेत. यासाठी तज्ज्ञ हेडफोन वापरण्याचा सल्ला देतात. हेडफोनमुळे तुम्हाला ध्वनींच्या दिशात्मक हालचाली अनुभवण्यास मदत होते.

ज्यांनी हे करून पाहिले आहे त्यांच्या मते, जिथे तुम्ही व्यत्यय न येता आराम करू शकता अशा आरामदायी आणि शांत जागेत बसून ब्रेन फ्लॉसिंग केल्याने या मेंदूवर सर्वोत्तम परिणाम होतो.

म्युझिक आणि जागा निवडल्यानंतर डोळे बंद करा आणि ध्वनींच्या हालचालीवर लक्ष केंद्रित करा. यामुळे तुमचे मन स्वच्छ होईल आणि तुमच्या शरीराला आराम मिळेल. विशेषतः तणावाच्या वेळी किंवा मानसिक स्पष्टता शोधत असताना, तुम्ही या पद्धतीचा वापर केल्यास तुम्हाला मानसिक स्थिती उत्तम राखण्यासाठी फयदा होईल.

### तेथे कर माझे जुळती

# मंगल पांडे स्मृतिदिन

भारतीय स्वातंत्र्य युद्धाची मंगल ज्योत चेतवणारा पहिला हुतात्मा म्हणून मंगल पांडे यांची नोंद इतिहासात करण्यात आली आहे . त्यांचा जन्म उतर प्रदेशातील बलिया जिल्ह्यातील नगवा या गावी झाला. 1857 चे स्वातंत्र्ययुद्ध सुरु झाल्यानंतर देशातील कानाकोपऱ्यातून सर्व भाषिक रयतेकडून त्याच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या . ब्रिटिशांनी या युद्धाला ' बंड ' असे म्हटले. त्याची खरी सुरुवात इंग्रज फौजेतील मंगल दिवाकर पांडे या एका भारतीय स्वातंत्र्य सैनिकाने केली . मंगल पांडे हे लहान पणापासून भारतीय संस्कृतीचे उपासक व पूजक होते . ते राष्ट्रप्रेमी व स्वामीभक्त होते. वयाच्या अठराव्या वर्षीच ते इंग्रजी सैन्यात दाखल झाले होते.



### 1857 च्या स्वातंत्र्य समराची ठिणगी

भारतीय स्वातंत्र्य युद्धाची सुरुवात एका महत्त्वाच्या प्रकरणामुळे झाली . त्याकाळी रायफलीची काडतु से काढण्या पूर्वी सैन्यातील शिपायांना काडतुसांवरची कवचे दाताने काढावी लागत . या काडतुसांना गाईची व डुकराची चरबी लावलेली असायची . त्यामुळे हिंदू आणि मुसलमान धर्मीय शिपायांमध्ये संताप उसळला . त्यांच्या धर्म श्रद्धेला तडा गेला . म्हणून इंग्रज सेनापतींची आज्ञा त्यांनी तात्काळ धुडकावून लावली . सैनिकांमध्ये द्वेषाग्नी भडकला . सर्वांनी हातातील बंदूक फेकून दिल्या . तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड कॅनिंग ने हा असंतोष ईस्ट इंडिया कंपनीला कळवून सुद्धा दखल घेण्यात आली नाही . त्यामुळे मंगल पांडेच्या मनात क्रांतीची ज्वाला भडकली .

दिनांक 31 मे 1857 रोजी संपूर्ण भारतात एकाच वेळी उठाव करण्याचा निश्चय घेण्यात आला .ईस्ट इंडिया कंपनीला या बंडाचा सुगावा लागला होता . तरीही बंगालमधील सैनिकांना चरबी असलेली काडतुसे देण्याचे ठरविले . बराकपुरची सेना या साठी निवडण्यात आली . इंग्रज सरकारची ही रेजिमेंट असूनही त्यामध्ये वजीर अली खाँ सारखे हिंदी शिपाई होते . त्यांनी अगोदरच या विरुद्ध आवाज उठविण्याचा निश्चय केला होता . त्यांना काडतुसे देण्यात आली .ती त्यांनी नाकारली .

19 नोव्हेंबरला ही तुकडी तोडण्याचे आणि त्या शिपायांकडील शस्त्रास्त्रे काढून घेण्याचे इंग्रज अधिकाऱ्यांनी ठरविले होते . त्या अगोदरच मंगल पांडेंना ही बातमी कळताच त्यांनी बंड ताबडतोब सुरू करण्याचा निश्चय केला . बाकीच्या शिपायांनी एक तारीख निश्चित केली होती . त्यामुळे त्यांनी मंगल पांडेंची सूचना मानली नाही . शेवटी आपणच बंडाचा बंडाची सुरुवात केली असे ठरवल्यामुळे भरलेली बंदूक घेऊन मंगल पांडे उठला सर्वांना उद्देशून तो म्हणाला, " भाईयों उठो, आप पीछे क्यूँ हट रहे हो ? मै आपको धर्म की सौगंध दिलाता हूँ , स्वतंत्रता तुम्हे पुकार ररी है । हम फौरनअपने धोखेबाज शत्रुओपर हमला बोल दे । रुकने का समय नही है । "

मंगल पांडे यांचे उद्गार ऐकताच उपस्थित असलेला इंग्रज अधिकारी त्यामुळे भडकला आणि त्याने एका जमादाराला त्यांना पकडण्याचा हुकूम दिला .परंतु त्या जमादाराने सदर हुकूम फेटाळून लावला . त्या वेळी चिडलेला इंग्रज अधिकारी लेफ्टनंट बॉग घोड्यावरून चालला होता . मंगल पांडे देखील घोड्यावर स्वार होते .मंगल पांड्यांच्या बंदुकीतून गोळी सुटली आणि ले . हेन्री बॉग हा अधिकारी घोड्यावरून खाली पडला . तात्काळ हयूस या ब्रिटिश अधिकाऱ्याने मंगल पांडेंवर गोळी झाडली . पण मंगल पांडेंच्या बंदुकीतून आधीच गोळी सुटली होती . दोन्हीही अधिकारी जमिनीवर कोसळले होते , हे पाहताच अनेक इंग्रज शिपाई आणि अधिकारी मंगल यांना पकडण्यासाठी धावत गेले . त्याआधी मंगल पांडे यांच्या बंदुकीच्या गोळ्यांनी अनेकांना टिपले होते . त्यामध्ये अनेक इंग्रज सैनिक जखमी झाले तर काही यम सदनी गेले . मोठया संख्येने धावून आलेल्या इंग्रज सैनिकां समोर आपला टिकाव लागणार नाही असे मंगल पांडे यांना कळून चुकले , म्हणून त्यांनी स्वतःवरच गोळी झाडून घेतली .जखमी अवस्थेतील मंगल पांडे यांना इंग्रजांनी पकडले .कोर्ट मार्शल झाले . केवळ सूड भावनेने मंगल पांडे यांना सर्व शिपायांसमोर दिनांक आठ एप्रिल 1857रोजी बराकपूर येथे फाशी देण्यात आले .स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडामध्ये आत्माहुती देणारा मंगल पांडे हा पहिला हुतात्मा ठरला .आणि भारतीय स्वातंत्र्य युद्धाला तोंड फुटले . स्वातंत्र्य संग्रामातील पहिल्या राष्ट्र नायकाच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# शब्दांच्या राज्यात

– शुभांगी पासेबंद



शब्दांच्या राज्यात रमायला, साऱ्यांनाच आवडते परीक्षेच्या अभ्यासात्या पुसेतकांचा कंटाळा येतो पण बरेचजण तर माझ्यासारखे पुस्तकी किडे असतात. चांगले शब्द ही जगाची संपत्ती असते.

Words worth is the, world,s worth

शब्दांच्या राज्यात ,राज्यरचनेबद्दलच्या काही खास बाबी बघा.

1. डॉक्टर स्यूस यांनी लहान मुलांसाठी जे ग्रीन एग्ज अँड हॅम, हा हिरवी अंडी व सुरण हे सुवर्ण पुस्तक लिहीले आहे, त्यात फक्त पन्नास शब्द आहेत.पण हो,त्या शब्दांची वेगवेगळी रचना आहे.
2. क्या है,को अहम, असा आवाज करून बाळ रडते तो त्याचा पहिला शब्द असतो,ईति मी,शुभांगीदवी.
3. युरेनस च्या ग्रहाला जे उपग्रह आहेत यांची नावे कशी ठेवली माहीत आहे का? लेखक शेक्सपिअर यांच्या नाटकातील पात्रावरून ती ठेवलेली आहेत.उदाहरणात ज्युलिएट (नाटक रोमिओ व ज्युलिएट) मिरांडा,(नाटक द टेम्पेस्ट) ओफेलिया (नाटक)हॅम्लेट. पोर्टिया,प्रॉस्पेट रो केली बॅन,या नावांनी चालवला ग्रहांचा गाव आहे.
4. गेट्स ऑफ पॅराडाईज, स्वर्गद्वार ही कादंबरी फक्त दोन वाक्यांच्या आहे मात्र या दोन वाक्यात चाळीस हजार शब्द आहेत
5. दोन हजार चार साली फ्रेंच लेखक मायकल थॅलर यांनी दोनशे तेहतीस पानी कादंबरी प्रकाशित केली. नवल म्हणजे या कादंबरीत एकही क्रियापद नाही. Sentence is complete with verb असे म्हणत असले जाते,तरीही!
6. दर वर्षी अनेक पुस्तक प्रकाशित होतात त्यातील केवळ दोन टक्के पुस्तके अर्थ फायदा देतात.
7. प्रत्येक व्यक्ती जीवनात जीवनात एक तरी पुस्तक छान लिहू शकते.
8. बहुतांशी आत्मचरित्र,ही अर्धसत्य असतात, हाइड अँड सीक अशी असतात.
9. अगदी सहा शब्दात सुद्धा अर्थपूर्ण कथा सांगता येते .उदारणार्थBaby shoes for sale,not used. किती प्रकारच्या कल्पनांच्या शक्यता सहा शब्दात मिळतात ,बघा.
10. शब्दांच्या आभासी जगात,कल्पनेला खूप वाव असतोAudio visualsमध्ये जे दिसते ते मानावे लागते ,पण शब्द वाचतांना वाचक स्व कल्पनेने नायक नायिका काम,कथा परिस्थिती आणि भावना ठरवतो.
11. शब्दांच्या राज्यात रमले कि सोपा टाइमपास होतो.शब्द हेच आपले छंद व्यासंग धंदा कला आवड मार्गदर्शन आणि आधार आहेत.

They are Bricks of your house .

# पक्षांना विद्यार्थ्यांनी ठेवले दाणा पाणी





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वाटीत एवढेसे पाणी भरून ठेवा, पक्षी दिशा दिक्षांना फिळतील ते थव्यानी सुटतील कंठत्यांचे मग शोधतील पाणी पाणी, त्यांच्या करीता एवढेच करा वाटीत पाणी भरून ठेवा या उक्तीप्रमाणे जिल्हा परिषद शाळा चिरड केंद्र करवले, येथे उपक्रम शील शिक्षिका छाया शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील विद्यार्थ्यांनी शाळेच्य प्रांगणात व झाडावर पक्षांसाठी खाणावळ सुरू केली. दररोज पक्षांसाठी मुठभर दाणे आणण्याचे आश्वासन दिले. मुलां मध्ये पशुपक्षी याबदल दया निर्माण करणे व सामाजिक बांधिलकी रूजवण्याचा प्रयत्न छाया शिंदे व विजय पाटील दोन वर्षापासुन करत आहेत. त्यांचे तिसरे वर्ष असून हा उपक्रम करण्याचा प्रयत्न सर्वांनी मिळून आवडीचा शनिवार या सत्रांत केला. सर्वाकडुन या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# अंबरनाथ पश्चिमेत एक दिवसाआड पाणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथः वाढणारे तापमान आणि पर्यायाने वाढणाऱ्या पाणी मागणीवर पर्याय उपलब्ध नसल्याने अखेर अंबरनाथ शहरात पाणी कपात लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण उन्हाळा पाणी पुरवण्यासाठी अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम भागात चक्राकार पद्धतीने पाणी कपात लागू केली आहे.



त्यानुसार अंबरनाथ पश्चिमेत एक दिवसाआड तर पूर्व भागात कोणत्या न कोणत्या भागात एक दिवस पाणी पुरवठा बंद ठेवला जाणार आहे. त्यामुळे अंबरनाथकरांना एप्रिल महिन्यातच पाणी टंचाईच्या झळा जाणवू शकतात. त्यामुळे नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात येते आहे.

गेल्या काही दिवसांपासून उन्हाच्या पाऱ्याने सर्वांनाच घामाघुम केले आहे. ठाणे जिल्ह्याचे तापमान सरासरी ४० अंश सेल्सियसपर्यंत पोहोचत असल्याने परिणामी वातानुकुलीत यंत्रणा आणि पाण्याची मागणी वाढल आहे. पाण्याची वाढलेल्या मागणीमुळे उपलब्ध पाणी जून अखेरपर्यंत टिकवण्यासाठी अंबरनाथ शहरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जल व्यवस्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे आता अंबरनाथ शहरातल्या पूर्व भागात कोणत्या न कोणत्या भागात एक दिवस पाणी पुरवठा बंद केला जाणार आहे. सोमवार ते रविवार आठवडाभर एका भागात पाणी पुरवठा बंद असेल.

### नथुराम गोडसे यांची प्रतिमा झळकावून

# समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

### महिला काँग्रेसने घेतली सहाय्यक आयुक्तांची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रविवारी प्रभू श्री राम यांच्या जन्मोत्सवानिमित्त कल्याण पूर्व येथे शोभायात्रा काढण्यात आली होती. त्या शोभायात्रेत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महाराणा प्रताप अशा महापुरुषांच्या प्रतिमा त्यांनी आपल्या समाजाप्रती केलेल्या महान कार्याबद्दल झळकवत होते. पण त्याच शोभायात्रेत काही समाजकंटक नथुराम गोडसे ज्यांनी आपले राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची हत्या केली होती अशा समाजकंटकाची प्रतिमा झळकावून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.



**रामनवमी निमित्त काढलेल्या शोभायात्रेत झळकवली होती नथुराम गोडसे यांची प्रतिमा**

याबाबत कल्याणचे सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांना निवेदन देऊन अशा समाजकंटक कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आज कल्याण डोंबिवली महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष कांचन कुलकर्णी आणि शिष्टमंडळाच्या वतीने करण्यात आली. या वेळी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जपजीत सिंग, प्रदेश सचिव सुरेंद्र आढाव, प्रदेश प्रतिनिधी मुन्ना तिवारी, कार्याध्यक्ष राजाभाऊ पातकर, महिला काँग्रेसच्या सरचिटणीस कोमल भोसले, मोहने टिटवाळा महिला ब्लॉक अध्यक्ष उर्मिला भोईर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# सुसज्ज आगरी भवन उभारणार – सौ.चित्रलेखा पाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : सुसज्ज आगरी भवन अलिबाग खंडाळा येथे उभारणार असल्याची घोषणा पी एन पी शिक्षण संस्थेच्या कार्यवाहक सौ चित्रलेखा पाटील ऊर्फ चिऊताई यांनी कुर्डूस येथील श्रीरामंदिराच्या भव्य प्रांगणात आगरी समाजबांधवांच्या उपस्थितीत त्यांनी ही घोषणा केली. स्वर्गीय कोकणसिंह नारायण नागू पाटील यांच्या नावाने सदर आगरी भवन उभारण्यात येणार असल्याची माहिती आगरी सामाजिक संस्था अलिबाग चे अध्यक्ष कैलास पिंगळे यांनी दिली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक सुरेश भोपी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून पी एन पी शिक्षणसंस्थेच्या कार्यवाह सौ चित्रलेखा पाटील, अलिबागच्या माजी नगराध्यक्षा अँड मानसी म्हात्रे, पत्रकार उत्कर्ष समिती रायगड जिल्हाध्यक्ष तथा आवाज महामुंबईचा चॅनेल संपादक मिलिंद खारपाटील आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांचे स्वागत



करून सुरुवात ईशस्तवन आणि स्वागत गीताने करण्यात आली.

अवघा आगरी एक व्हावा हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात हळदीकुंकू आणि समाजासाठी बहुमूल्य योगदान देणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते आगरी समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविकातून जयश्री पाटील यांनी आगरी सामाजिक संस्थेची वाटचाल, पर्यटन दृष्टीने अलिबाग तालुक्यातील कुर्डूस परिसर कसा समृद्ध आहे हे सांगितले.नारायण नागू पाटील यांनी शेतकऱ्यांसाठी केलेला चरीचा संप ,आणि ब्रिटिश सत्तेला हादरवणारा चिरनेर येथील जंगल सत्याग्रह आगरी समाजातील लोकांनीच केला असल्याचे अधोरेखित केले. आगरी सामाजिक संस्था अलिबाग चे अध्यक्ष कैलास पिंगळे यांनी सांगितले की संकटाशी न डगमगता सामना करतो तो आगरी.हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी.तसेच अलिबागच्या पाटील बंधूंनी रायगड जिल्ह्यात शिक्षणाची ज्ञानगंगा आणल्याचे त्यांनी सांगितले तर सौ चित्रलेखा पाटील यांनी विकास झाला पाहिजे मात्र येथील स्थानिक आगरी मालक राहिला पाहिजे, नोकर नको असे सांगितले.आगरी समाजासारखी जिद्द कुठेच नाही असेही त्यांनी सांगितले. जयंतभाई पाटील, नृपाल पाटील, चित्रलेखा पाटील असे तिघामिळून अलिबागेत आगरी भवन बांधून देण्याची घोषणा त्यांनी केले. ॲड मानसी म्हात्रे म्हणाल्या की आगरी सामाजिक संस्थेने जे छोटेसे रोपटे लावले होते त्याचा आता वटवृक्ष झाला आहे. अजूनही विस्तार अपेक्षित आहे आणि तो नक्कीच होईल.आगरी संस्कृती, कला पुढे आणण्याची गरज आहे. असेही त्या म्हणाल्या.त्यांनी आपल्या भाषणातून आगरी समाजाची महती विशद केली. अध्यक्षीय भाषणात सुरेश भोपी यांनी आता आगरी समाजाने एकत्र येण्याची गरज असल्याचे सांगून आता वज्रमूठ आवळली पाहिजे असे आवाहन केले.कार्यक्रमात अनेकांचा सत्कार झाला.जय आगरी एक आगरी, लाखांना भारी या घोषणेने कुर्डूस परिसर दुमदुमून गेला होता.

# वाहतूक उपविभागाच्या बेवारस वाहनांचा होणार लिलाव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणेनगर वाहतूक उपविभागाच्या कार्यक्षेत्रात बेवारस स्थितीत आढळलेली 30 वाहने ठाणेनगर वाहतूक उपविभाग कार्यालयाच्या आवारात पडून आहेत. (वाहनांची यादी सोबत जोडली आहे)



यादीत नमूद वाहनांचे मूळ मालकांचा आर.टी.ओ मध्ये उपलब्ध असलेल्या पत्त्यावर नोटीस पाठवून शोध घेण्यात आला. परंतू या वाहनांच्या मालकीचा दावा करण्यासाठी कोणीही ठाणेनगर वाहतूक उपविभाग कार्यालय येथे आलेले नाहीत.या वाहनांची विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याने या वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे. ही वाहने ज्या व्यक्तींच्या मालकीची असतील त्यांनी मोटार वाहनासंबंधी मूळ कागदपत्रांसह दि.10 एप्रिल 2025 रोजी सकाळी 11 वाजेपर्यंत ठाणेनगर वाहतूक उपविभाग ठाणे येथे समक्ष हजर राहावे, अन्यथा या मोटार वाहनांचा जाहीर लिलाव करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन ठाणेनगर वाहतूक उपविभागाच्या पोलीस निरीक्षक रोहिणी सोनार यांनी केले आहे.



# श्रीराम नवमीनिमित्त कल्याणात शोभायात्रा

## माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने शोभायात्रेचे आयोजन







दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणकारांची यंदाची श्रीराम नवमी सर्वार्थाने अत्यंत भक्तीमय आणि भारदस्त अशी ठरली. निमित्त होते ते भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेचे. कल्याणातील प्रत्येक समाज घटकाने या शोभायात्रेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवल्याने यंदाची ही शोभायात्रा अभूतपूर्व अशी ठरली.

कल्याण पश्चिमेतील ऐतिहासिक दुर्गाडी देवीच्या महाआरतीनंतर दुर्गाडी चौकातून सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास या शोभायात्रेला उत्साहात प्रारंभ झाला. श्रीरामाची प्रतिमा असणारे भगवे झेंडे, भगव्या टोप्या आणि पारंपारिक भगवी वस्त्रे घालून हजारो श्रीरामभक्त या शोभायत्रेत सहभागी झाले होते. तर त्याजोडीला ढोल ताशांचा गजर आणि जय श्रीरामाच्या घोषणांनी संपूर्ण आसमंत दुमदुमून गेलेला पहायला मिळाला. विशेष म्हणजे कल्याण शहरातील प्रत्येक समाजाचे शेकडो ज्ञाती बांधव-भगिनींनीही पारंपरिक पोशाखात या शोभायात्रेत सहभाग घेतल्याचे दिसून आले. त्यासोबतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेसह भारतीय जनता पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्तेही या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दुर्गाडी चौकापासून सुरू झालेली ही शोभायात्रा लालचौकी, सहजानंद चौक, देवी अहिल्यामाता चौक, लोकमान्य टिळक चौकमार्गे पार नाका येथील श्रीराम मंदिर येथे महाआरती करून मग संपन्न झाली. पार नाका येथे महा आरतीनंतर या शोभायात्रेचा समारोप झाल्यानंतर सुप्रसिद्ध इस्कॉन संस्थेतर्फे उपस्थितांना प्रसाद वाटपही करण्यात आले. अनेक वर्षांच्या न्यायालयीन लढ्यानंतर प्रभू श्रीरामांना आपले मंदिर प्राप्त झाले. हा केवळ हिंदुस्थानातील नव्हे तर संपूर्ण जगभरातील हिंदूंच्या दृष्टीने आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. त्याच अभिमानातून आजच्या श्रीराम नवमीच्या शोभायात्रेत श्रीरामभक्तांचा जनसमुदाय लोटल्याने या शोभायात्रेलाअभूतपूर्व असे स्वरूप प्राप्त झाल्याची भावना माजी आमदार नरेंद्र पवार यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

# सातरस्ता येथे २१० निरंकारी भक्तांचे उत्साहपूर्ण रक्तदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 'रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको' या उदात्त भावनेतून संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने रविवारी मुंबई पब्लिक स्कूल, शांतीनगर, सातरस्ता येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात 210 निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. संत निरंकारी रक्तपेढी, विले पार्ले मार्फत रक्त संकलन करण्यात आले.

निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षा जी यांचे कथन आहे, की जीवन तेव्हाच महत्वपूर्ण ठरते जेव्हा ते इतरांसाठी जगले जाते. हीच शिकवण धारण करुन निरंकारी भक्त निष्काम भावनेने निरंतर मानवतेच्या सेवेमध्ये आपले योगदान देत असतात. संत निरंकारी मिशनच्या डिलाईल रोड आणि लोअर परळ ब्रांचच्या रक्तदात्यांनी या शिबिरामध्ये अत्यंत उत्साहाने भाग घेत जवळपास 270 रक्तदात्यांनी रक्तदानासाठी आपली नावे नोंदविली होती.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन संत निरंकारी मंडळाच्या डिलाईल रोड विभागाचे संयोजक गोपीनाथ बामुगडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संत निरंकारी (मराठी) मासिकाचे संपादक चंद्रकांत जाधव यांच्यासह अनेक प्रबंधक व सेवादल अधिकारी उपस्थित होते. दोन्ही ब्रांचचे सेवादल युनिट आणि मुखी अनंत घानकुटकर यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले.


ॲड. वसंत कटारनवरे

जाहिर नोटीस

## कल्याण येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात, कल्याण

चौंकशी अर्ज नं. ३९/२०२४

**श्रीमती. शोभादेवी प्रसादराव वीना..... अर्जदार**

**विरुद्ध**

**श्री. रविंद्र बाबु लिंगम व इतर..... सामनेवाले**

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचे वडिल मयत कै. लिंगम गांधी, यांचे दिनांक ३१/१२/२०२२ रोजी तसेच अर्जदार यांची आई कै. नांचराम्मा लिंगम गांधी यांचे दिनांक १४/०५/१९९६ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार यांची बहिण नामे प्रमिलादेवी गांधी लिंगम दिव्यांग व्यक्ती असुन हक्क अधिनियम २०१६ चे कलम १४ अन्वये, अर्जदार शोभादेवी प्रसादराव वीना यांच्या बहिणीचे करीता इतर व्यवस्था करण्याकरीता व विनीयोग करण्याकरीता, हाताळण्याचे तसेच दिव्यांग बहिण नामे प्रमिलादेवी गांधी लिंगम हिचे हिश्श्यास येणाऱ्या मिळकतीचे देखभाल, व्यवहार हाताळण्याचे तसेच माझ्या मयत वडिलांचे पेन्शनची रक्कम जी तिला मिळणार आहे त्यास आमचे सर्व भाऊ बहिणीची कुठलीही हरकत नाही. ती रक्कम अर्जदार यांनी हाताळणेकामी हुकूम व्हावेत व अर्जदार यांना गार्डीयन म्हणुन ठरवुन मिळणेकरीता :-

तरी, सदरचे प्रकरण हे दिनांक ०७/०५/२०२५ रोजी मे. कोर्टात सुनावणीकामी ठेवले असुन सदर मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अथवा व्यक्तीचा कायदेशीर हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार , हरकत वगैरे असल्यास, त्याने तशी लेखी हरकत हा जाहिरनामा झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत हया न्यायालयात हजर होऊन दाखल करावी. वरील मुदतीत कोणीही योग्य हरकत न दाखल केल्यास कोणालाही काहीही म्हणणे नाही. असे समजुन सदरहु मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल योग्य तो पुरावा घेवुन अर्जदारांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहु मयताचे मिळकतीचे गार्डियन म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजी माझ्या सहिने दिले.

हुकूमावरुन

कल्याण कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
अति.जिल्हा व सत्र न्यायालय
कल्याण


# बौद्धगया येथील महाबोधी बुद्धविहार तत्काळ मुक्त करा अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करणार

## मुंबईतील मोर्च्यात कल्याण डोंबिवलीतील कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग

**– आनंदराज आंबेडकर**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाबोधी मुक्त विहारासाठी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय नेते सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भायखळा ते आझाद मैदान मंत्रालय येथे काढण्यात आलेल्या महामोर्चात महाराष्ट्रातून हजारो बौद्ध उपासक उपासिकांनी सहभाग घेतला होता.

यावेळी आनंदराज आंबेडकर यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. जिल्हयातून रेल्वेने येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी रेल्वे प्रशासनाकडून कुठल्याही प्रकारची अडचण येऊ न देण्याकरिता रेल्वेचे आर.पी. एफ चे कल्याण डिव्हिजनल ऑफिसर मनोज यादव यांच्याशी कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष आनंद नवसागरे यांनी सुमारे अर्धा तास चर्चा केली होती. व मोर्चाचे नियोजन सांगितले होते.



त्या प्रमाणे रेल्वे प्रशासनाकडूनही कार्यकर्त्यांना योग्य सहकार्य लाभले. रिपब्लिकन सेनेचे कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष (पँथर) आनंद नवसागरे यांच्या नेतृत्वाखाली कल्याण डोंबिवली शहरातून शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थिती धरणे आंदोलन, रास्ता रोको करण्यात आला. दरम्यान मुंबई पोलिसांनी आंदोलन कर्त्यांना अटक केली.

या मोर्चात भारतीय बौद्ध महासभेचे डोंबिवली शहर अध्यक्ष संजय खराटे, देवानंद मनवर,शरद खरात,रमण भोसले,चंद्रभागा रूपवते,शिला सुतार, देवांगणा लोखंडे, पुष्पा तुपसमुंदर,रिपब्लिकन सेनेचे ठाणे महिला अध्यक्ष अलका जगताप,कायदेशीर सल्लागार एड्. महेंद्र निकम,ठाणे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण मिरके,कल्याण महिला अध्यक्ष रेखा गोडबोले,कल्याण शहर अध्यक्ष दामू काऊतकर,उल्हासनगर शहर अध्यक्ष दीपक अहिरे,डोंबिवली शहर संघटक युवराज वाटूरे,युवा अध्यक्ष सुभाष शिरसाट,अर्जुन जाधव(उपाध्यक्ष) ,नितीन साबळे(संघटक),रामकिसन सोनवणे,किरण वाटाणे,छाया लांडे,सखुबाई खंदारे,मीरा काऊतकर, सुंदर काऊतकर, सतीश गोडबोले, किरण भालेराव, महादेव सह शेकडो बौद्ध उपासक उपासिका बौद्धजन पंचायत समिती,भारतीय बौद्ध महासभा,रिपब्लिकन सेना,समता सैनिक दल पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



# महाराष्ट्रात उष्णतेची लाट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : देशात उष्णतेची तीव्रता वाढत आहे. रविवारी पाच राज्यांमधील २१ शहरांमध्ये ४२ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली. पुढील काही दिवस दिल्ली, राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये उष्णतेची लाट कायम राहील. तसेच देशात उष्णता वाढू लागली आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, पुढील तीन दिवस महाराष्ट्र, गुजरात आणि ओडिशातील अनेक शहरांनाही तीव्र उष्णतेचा सामना करावा लागेल.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात तापमानात वाढ झाल्यामुळे, प्रत्येक शहरातील तापमानात तीन अंश ते ६.९ अंशांचा मोठा फरक दिसून आला. हवामान खात्याने म्हटले आहे की, वाऱ्याचा वेग कमी असल्याने उष्णता वाढली. हवामान खात्याने सांगितले की, वाऱ्याचा वेग कमी असल्याने तापमानात झपाट्याने वाढ झाली आहे. तसेच महाराष्ट्र, गुजरात आणि अगदी ओडिशामध्येही उष्णतेची लाट कायम राहील.

# महिला ग्राहकांशी मराठीतच संवाद साधावा

## - डॉ. सुवर्णा भारत कराड यांचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पुणे : "महाराष्ट्रातील बँका व शासकीय आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या सर्व महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या महिला ग्राहकांशी संवाद साधताना मराठी भाषेचाच वापर करावा," असे ठाम आवाहन वंजारी महासंघाच्या महिला विभागाच्या राज्य अध्यक्षा डॉ. सुवर्णा भारत कराड यांनी केले आहे.

डॉ. कराड यांनी सांगितले की, "राज्यभरातील अनेक महिला विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागातील, शिक्षणाने सक्षमी नसतात. अशा महिलांना हिंदी किंवा इंग्रजी समजणे कठीण जाते. त्यामुळे त्यांच्याशी मातृभाषेत संवाद साधल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढतो व त्यांना बँकिंग सेवा तसेच शासकीय योजनांची योग्य माहिती मिळू शकते."



त्यांनी पुढे सांगितले की, "बाहेरील राज्यांतून आलेल्या नागरिकांसाठी संबंधित बँक किंवा शासकीय आस्थापनांनी अन्य भाषांचा वापर करावा, यात हरकत नाही. मात्र महाराष्ट्रातील नागरिकांसाठी, विशेषतः महिलांसाठी, संवादाची प्राथमिक भाषा मराठी असावी."

"भाषेतील अपुरेपणा किंवा गैरसमजामुळे अनेकदा महिलांना अपमानित वाटते किंवा त्या सेवांचा लाभ घेण्यास मागे पडतात. म्हणून सर्व महिला कर्मचारी भगिनींनी मराठी भाषेत सुसंवाद साधून महिलांच्या आत्मसन्मानाला हातभार लावावा," असेही डॉ. कराड यांनी नमूद केले.

# श्री भिमेश्वर सद्गुरु नित्यानंद संस्थानच्या अध्यक्ष पदी डॉ.नयनसिग जे ठाकोर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वज्रेश्वरी : महाराष्ट्र सह देश विदेशात सु प्रसिद्ध असलेल्या श्री भिमेश्वर सद्गुरु नित्यानंद संस्थानच्या अध्यक्ष पदी डॉक्टर नयनसिग जे ठाकोर वकील याची बिनविरोध निवड करण्यात आली आहे नुकत्याच झालेल्या विश्वस्त मंडळाच्या सभेत हजर असलेल्या विश्वस्ता मधुन डॉक्टर श्री नयनसिग ठाकोर याची अध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे .

भिवंडी तालुक्यातील सुपरिचित असलेल्या गणेशपुरी येथील योगभूमी स्वामी नित्यानंद महाराज यांच्या श्री भिमेश्वर सदगुरु नित्यानंद संस्थेच्या अध्यक्ष पदी डॉ नयनसिंह जे. ठाकोर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ते डॉ.बाळासाहेब सांवत कोकण कृषी विद्यापीठ चे माजी अधिष्ठाता , दापोली येथे होते. तसेच त्यांना कृषी व अन्न प्रक्षिया तत्रज्ञान; पदी चा अनुभव गेल्या : ४५ वषे पासून आहे.त्याचा निवडीमुळे परिसरात भाविक, ग्रामस्थ मध्ये समाधान व्यक्त केले जात असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



डॉ. नयनसिंह जे. ठाकोर यांचा संक्षिप्त परिचय

1)अध्यक्ष, वैज्ञानिक पॅनल (धान्य, कडधान्य व बेकरी उत्पादने), भारतीय खाद्य सुरक्षा एवं मानक प्राधिकरण (FSSAI), भारत सरकार, नवी दिल्ली, ,2)सदस्य, वैज्ञानिक समिती, भारतीय खाद्य सुरक्षा एवं मानक प्राधिकरण (FSSAI), भारत सरकार, नवी दिल्ली,3)सदस्य, फुड अँड ऍग्रीकल्वर डिव्हीजन-१० (FAD-10), ब्युरो ऑफ इंडियन स्टैंडर्ड्स, नवी दिल्ली. 4)विशेष व्याख्याते, भारतीय सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स, नवी दिल्ली, 5)शालेय शिक्षण: जे. एस. रुंगटा हायस्कूल, नाशिक. महाराष्ट्र. (१९६५-७१), 6)बी. टेक. (कृषी अभियांत्रिकी): महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी महाराष्ट्र. १९७१-७७) , 7)एम. टेक. (कृषी अभियांत्रिकी): आय आय टी (III) खडगपूर, पश्चिम बंगाल (१९७७-७९), 8)पीएच. डी. (कृषी अभियांत्रिकी): सासस्केचवन युनिव्हर्सिटी, सासकॅटून, कॅनडा (१९८९-९३)

**शिष्यवृत्तीः**

आय आय टी मध्ये पदव्युत्तर शिक्षणाकरीता भारत सरकारची शिष्यवृत्ती (१९७७-७९).,कॅनडा मध्ये डॉक्टरेट अभ्यासासाठी रोटरी फाउंडेशन, अमेरीका (USA) ची शिष्यवृत्ती (१९८९-१९९३),कार्यसेवा अनुभव (३८ वर्षे),

**पुरस्कारः**

, जपान कडून सर्वोत्तम संशोधन पत्र पुरस्कार,ICAR नवी दिल्ली चा सर्वोत्तम शिक्षक पुरस्कार दापोली),अग्रो-केअर कृषी मंच, नाशिक कड़न सर्वोत्तम शिक्षक पुरस्कार आदी विविध महत्वाच्या पदावर असून तसेच शासनाने त्यांना अनेक पुरस्कार ने गौरविले आहे. त्यांची गणेशपुरी येथील स्वामी नित्यानंद महाराज यांच्या संस्थेवर अध्यक्ष पदी निवड होताच इतर सहकारी विश्वस्त कर्मचारी व स्थानीक ग्रामस्थांनी त्यांना शुभेच्छा देऊन देवस्थान च्या विकासाची अपेक्षा व्यक्त केली आहे.






# आई वडिलाच्या पुण्यस्मरणानिमित्त रक्तदान शिबीर

## *फळेगाव येथील ग्रामस्थांनी केले रक्तदान*

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : वडील वै ह भ प श्री बाळू बांगो जाधव व आई वै ह भ प रखमाबाई बाळू जाधव यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण निटमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन दत्त मंदिर हॉल फळेगाव टिटवाळा रोड येथे करण्यात आले होते या कामी सेंट्रल हॉस्पिटल उल्हासनगर -3 चे डॉक्टर वाघमारे व त्यांची टीम यांच्या सहयोगाने रक्तदान शिबिर पार पाडण्यात आले फळेगाव ग्रामस्थ



नातेवाईक व मित्रपरिवार यांनी रक्तदान केले हा छोटासा उपक्रम आम्ही सामाजिक जाणीवेतुन राबवला असे श्री काशिनाथ जाधव सर यांना विचारले असता त्यांनी सांगितले या सामाजिक उपक्रमासाठी कु भूषण माळू गायकर वाशिद कु अक्षय बालाराम बांगर रुन्दे श्री गोपीनाथ सुदाम भोईर उशिद श्री दीपक रामचंद्र घोडवींदे सारमाळ जितेंद्र बाळू जाधव खातिवली मार्तंड जमदरे, पुंडलिक कंटे, हवेश सुरोशे,मुरबाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच या प्रसंगी श्री भगवान तारमळे, श्री रुपेश पितांबरे, श्री रमेश भोईर, आत्माराम तारमळे, उशीद श्री बळीराम झीप्पा जाधव, व दत्तात्रय बाळू जाधव हे उपस्थित होते



# हेटवणे जलवाहिनीचा पाणीपुरवठा २४ तास बंद राहणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : सिडकोतर्फे हेटवणे जलशुद्धीकरण केंद्र व जलवाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे बुधवार दि.9 एप्रिल रोजी सकाळी 6 वाजेपासून ते गुरुवार दि. 10 एप्रिल रोजी सकाळी 6 वाजेपर्यंत पेण पनवेल उरण द्रोणागिरी, जेएनपीटी, उलवे, खारघर आणि तळोजा नोडसह हेटवणे जलवाहिनीवरील सर्व गावांतील पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तसेच, त्यानंतर पुढील 24 तास कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे. त्यामुळे प्रभावित परिसरातील नागरिकांनी याची नोंद घेऊन, पाणी साठवण्याची योग्य ती व्यवस्था करावी. त्याचबरोबर या कालावधी दरम्यान पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

# गुंतवणूकदार उद्योजकांचे कोकण विभागात स्वागत..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे :कोकण विभागामध्ये औद्योगिक धोरण राबविताना विविध ठिकाणांवरून येणाऱ्या गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि गुंतवणूक वाढावी, याकरिता सामूहिक प्रयत्न करण्यात येतील. यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी आज येथे केले.

कोकण विभागातील गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे, त्यांच्या अडचणींचे निराकरण करणे तसेच त्यांच्या पोलीस विभागाकडील अडचणी यासाठी प्रभावीपणे हाताळणे याबाबत कार्यकारी समितीची बैठक कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांचे अध्यक्षतेखाली आज विभागीय आयुक्त कार्यालय सभागृह, कोकण भवन, सीबीडी, बेलापूर येथे संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील संबंधित प्रादेशिक अधिकारी, मैत्री नोडल अधिकारी, पर्यटन, आरोग्य, शिक्षण इ. विभागाचे अधिकारी, उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, चेंबूर, कोकण विभागातील जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक, नामांकित शैक्षणिक संस्था प्रतिनिधी, इ. अधिकारी तसेच कोकण विभागातील औद्योगिक संघटना- फेडरेशन ऑफ इंडस्ट्रिज, टिसा, तळोजा इंडस्ट्रिज असोशिएश्न, रोहा इंडस्ट्रिज असोशिएशन, लोटे परशूराम औद्योगिक संघटना, वसई-विरार इडस्ट्रिज असोशिएशन, लघु उद्योग भारती, इ. चे अध्यक्ष, तथा प्रतिनिधी तसेच औद्योगिक वसाहती – जवाहर सहकारी औद्योगिक वसाहत, खोपोली औद्योगिक वसाहतचे प्रतिनिधी व्ही.सी. द्वारे बैठकीस उपस्थित होते.

तसेच अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) कोकण विभाग संजय पलांडे, उद्योग सह संचालक, कोकण विभाग श्रीमती विजू शिरसाठ, उप आयुक्त (पुरवठा), कोकण विभाग अनिल टाकसाळे, ठाणे जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सोनाली देवरे, उद्योग उप संचालक, कोकण विभाग श्रीमती सी.वि.पवार, पोलीस उपनिरिक्षक (स्पेशल ब्रांच) नवी मुंबई गणेश जाधव, प्रादेशिक अधिकारी, (म.औ.वि.म.)-ठाणे-2 सुनिल भुताळे, प्रादेशिक अधिकारी, (म.औ.वि.म.)-पनवेल डॉ.संतोष थिटे, प्रादेशिक अधिकारी, (म.औ.वि.म.)-महापे महेंद्र पटेल, प्रादेशिक अधिकारी, (म.औ.वि.म.)-ठाणे-1 उदय किसवे, ॲडमिन हेड, फेडरेशन ऑफ इंडस्ट्रिज ऑफ इंडिया रविंद्र सावंत, डायरेक्टर, मे. कपूर ग्लास संजीव कपूर, डायरेक्टर, तळोजा इंडस्ट्रिज असोशिएशन सतिश शेट्टी, प्रादेशिक अधिकारी, एम.सी.ई.डी. श्री. डी.यु. थावरे हे प्रत्यक्ष उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीस उद्योग सह संचालक, कोकण विभाग श्रीमती विजू शिरसाठ यांनी आपल्या प्रास्ताविकात गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे. व्यापारी / कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविणे. गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे. गुंतवणूकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे या निकषांची माहिती दिली. तसेच कोकण विभागात जिल्हानिहाय व विभागीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले त्यांतर्गत करण्यात आलेले सामंज्यस्य करार, होणारी प्रस्तावित गुंतवणूक, व रोजगार याबाबत माहिती तसेच कोकण विभागातील निर्यात, एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) याबाबतची माहिती दिली.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी म्हणाले की, उद्योग वाढीसाठी उद्योजकांना पोषक वातावरण निर्माण करण्याबाबत मुख्यमंत्री महोदय आग्रही आहेत. कोकण विभागामध्ये औद्योगिक धोरण राबविताना विविध ठिकाणांवरून येणाऱ्या गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि गुंतवणूक वाढावी, याकरिता सामूहिक प्रयत्न करण्यात येतील. यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. संबंधित जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक यांनी तात्काळ उद्योजकांच्या अडचणी सोडविण्याबाबत कार्यवाही करावी. ज्या मागण्या रास्त आहेत त्यांची तात्काळ पूर्तता करावी. तसेच आवश्यकता विचारात घेऊन, माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत माहिती देण्यात यावी. उद्योजकांना त्रास होता कामा नये ही बाब विचारात घ्यावी. एमआयडीसी वागळे इस्टेट मधील आठवडी बाजार स्थलांतरणाबात मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी यांच्याकडे संदर्भ करावे तसेच जिल्ह्यातील बेकायदेशीर गोडाऊनची माहिती घेऊन जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षकांनी त्यावर तात्काळ कारवाई करावी.

ते पुढे म्हणाले की, प्रादेशिक अधिकारी यांनी महानगर गॅस यांच्यामार्फत जोडण्यात येणाऱ्या पाईपलाईनबाबत योग्य ती कार्यवाही करावी तसेच जिल्हाधिकारी यांनी महानगर गॅस यांना तशा तात्काळ सूचना द्याव्या. ESIC हॉस्पिटल्स मध्ये डॉक्टर उपलब्धतेबाबत DISH विभागाशी पाठपूरावा करावा. तसेच शासन स्तरावरील बाबी सोडविण्याबाबत एमएमआरडीए, एमआयडीसी, एमएसइडिसीएल, ESIC इ. यांच्याकडे पाठपूरावा करण्यात येईल. उद्योजकांच्या अडचणी सोडविण्याकरिता यापुढे मासिक किंवा त्रैमासिक बैठका घ्याव्यात.

# पुस्तकी ज्ञानाला प्रात्यक्षिकाची जोड देत टिटवाळ्यामध्ये बेसिक इलेक्ट्रॉनिक्स वर्कशॉप संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : द सायन्स पॉईंट ॲक्टिव्हिटी अड्डा, टिटवाळा आणि द यंग सायंटिस्ट बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने टिटवाळ्यामध्ये बेसिक इलेक्ट्रॉनिक्स वर्कशॉप संपन्न झाले. बीएएसएफ सारख्या आंतरराष्ट्रीय केमिकल कंपनीत रीसर्च सायंटिस्ट म्हणून निवृत्त झालेले आणि कुतूहल एंटरप्राइजचे विलास वखारे यांनी अतिशय सोप्या आणि समर्पक शब्दांत मुलांना नवीन आणि तितकाच किचकट वाटणारा इलेक्ट्रॉनिक्स सारखा विषय समजावून सांगितला.

सध्याचे युग हे डिजिटल असल्याने दिवसांगणिक टेक्नॉलॉजीत सुधारणा होत आहेत. रोबोटीक, ड्रोन, कृत्रिम बुद्धिमत्ता इत्यादी नवनवीन टेक्नॉलॉजी ची माहिती असणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी मुलांना आधी बेसिक इलेक्ट्रॉनिक्स चे ज्ञान असणे अतिशय गरजेचे आहे. नेमकी हीच गरज ओळखून द सायन्स पॉईंट, ॲक्टिव्हिटी अड्डा तर्फे अत्यंत नाममात्र दरात बेसिक आणि अडवान्सड इलेक्ट्रॉनिक ची कार्यशाळा आयोजित केली होती.
या कार्यशाळेत विविध सर्किट्स जसे की वॉटर लेवल इंडिकेटर, सुपर प्रोक्सिमिटी सेन्सर, ऑटोमॅटिक फायर अलार्म, ऑटोमॅटिक नाईट लॅम्प, टच सेन्सिटिव्ह स्विच इत्यादी सर्किट्स मुलांना समजावून सांगण्यात आले आणि त्यांच्याकडून प्रत्यक्ष बनवून पण घेतले गेले. या सर्किट्स मध्ये वापरलेले डायोड्स, एलडीआर, ट्रांसिस्टर, थर्मीस्टर , बॅटरी आणि प्रत्यक्ष सर्किट्स बनवण्याचा अनुभव मुलांना खात्रीशीर समृद्ध करणारा होता.

द सायन्स पॉईंट ॲक्टिव्हिटी अड्डा , टिटवाळाचे किशोर पाटील यांनी ॲक्टिव्हिटी अड्डा तर्फे आकाशदर्शन, कोडिंग, बेसिक आणि ॲडव्हान्सह इलेक्ट्रॉनिक्स, डीआयवाय असे विविध विषयांवर सायंटिफिक वर्कशॉप घेतले जातात त्यात मुलांना सहभागी होण्याचे आवाहन केले.

पुस्तकातून फक्त माहिती मिळालेली पण प्रत्यक्ष सर्किट्स जोडताना मला खूप मज्जा आली आणि खूप नवीन गोष्टीही शिकायला मिळाल्या अशी प्रतिक्रिया आराध्य खिसमतराव या विद्यार्थ्याने दिली. तर यापूर्वी डायोड, ट्रांसिस्टर ही नावं फक्त मी ऐकली होती, मला यात खूप आवड आहे पण असं प्रत्यक्ष प्रॅक्टिकल करायला मिळत नव्हतं, आज संधी मिळाली असल्याचे हर्षवर्धन गीते याने सांगितले.

# नूतन विद्यालयात क्रिकेट ॲकॅडमीचे उद्धाटन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : छत्रपती शिक्षण मंडळाच्या नूतन विद्यालय,कर्णिक रोड, कल्याण या शाळेमध्ये नूतन क्रिकेट ॲकॅडमीचे उद्धाटन शनिवारी जिल्हा शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्षश्रीकांत तरटे, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, चिटणीस मीनाक्षी गागरे, भारती वेदपाठक, क्रिकेट प्रशिक्षक मोबिन शेख, अजहर काझी, माजी एमसीए निरीक्षक राजेश राणे, तसेच संस्थेचे आजी- माजी पदाधिकारी, पालक, हितचिंतक, माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उदघाट्न प्रसंगी शिक्षणाधिकारी दहितुले यांनी बॅटिंग करत क्रिकेटचा प्रत्यक्ष आनंद घेत शानदार उदघाट्न केले. नविन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव दिला पाहिजे असे मत जिल्हा शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांनी व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीकांत तरटे यांनी संस्थेच्या विविध शाळांतून गुणवंत विद्यार्थी नावारूपाला येतील अशी ग्वाही उपस्थितांना दिली.

## रायगडची अयोध्या बळवली नगरीत
# प्रभू श्रीरामनवमी मोठ्या उत्साहात संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : पेण तालुक्यातील बळवली नगरी ही रायगडची प्रति अयोध्या समजली जाते. दरवर्षी रायगड जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने श्रीराम भक्त या श्रीराम नवमी उत्सवात सहभागी होतात.

ग्रामस्थ मंडळ बळवली आयोजित श्रीराम जन्मोत्सव २०२५ आठवडाभर साजरा करत असतात.प्रभू श्रीराम हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक, प्रमुख आधारस्तंभ मानले जातात. अखिल मानव जातीचे आदर्श, एक मुखी एक पत्नी असे सर्वश्रेष्ठ मर्यादा पुरुषोत्तम म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. दुष्ट दुर्जनांचा नाश करून कुशल प्रशासनाचा आदर्श निर्माण करणारे मर्यादापुरुषोत्तम 'श्रीराम' हे सज्जनशीलता, मातृ-पितृ भक्ती आणि प्रेरणेचा आदर्श स्रोत आहेत.



या निमित्ताने गुढीपाडवा ते श्रीराम नवमी असा सकाळी ५ ते ७ काकड आरती ९ ते १२ व दुपारी १ते ग्रंथ वाचन,सायंकाळी ५ ते ६ प्रवचन, सायंकाळी ६ ते ७.३० हरीपाठ, ७.३० ते ८.३० संगीत भजन, ९ते ११.३० कीर्तन आणि रात्री १२ नंतर हरी जागर भजन असा दैनदिन कार्यक्रम संपन्न झाला.
यामध्ये वारकरी भजन मंडळ, बळवली ग्रामस्थ,श्रीराम भजन मंडळी बळवली तसेच बळवली पंचक्रोशीतील सर्व श्रीराम भक्त यांचे मोलाचे योगदान लाभले. सर्वजण श्रीरामांच्या भक्तीत लीन झाले होते.चैत्र शुद्ध नवमी, हिंदू पंचांगानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस आहे. या तिथीस भगवान विष्णूचा अवतार समजले गेलेले श्रीराम प्रभू यांचा जन्म झाला म्हणून हा दिवस श्रीराम नवमी म्हणून साजरा करतात. या दिवशी सूर्य डोक्यावर आल्यावर दुपारी बारा वाजता श्रीराम जन्माचा सोहळा साजरा होतो. बळवली फाटा ते बळवली गावापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा भगवे झेंडे आणि सुंदर अशा रांगोळी काढून सुशोभीकरण करण्यात आले होते. सर्व वातावरण श्रीराम भक्तिमय झाले होते. सकाळी १० ते १२.४० पर्यंत सौ.स्पृहा संकेत चक्रदेव- रत्नागिरी यांचे श्रीराम जन्मोत्सव पुष्पवृष्टीचे कीर्तन झाले. दुपारी १२ वाजून ४० मिनिटांनी सूर्य माथ्यावर आल्यावर प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीवर पुष्प सुमनांचा वर्षाव केला त्यानंतर आरती होऊन नंतर आलेल्या हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. प्रभू श्रीराम यांचे मनोभावे दर्शन घेतले.

# साई श्रद्धा सेवा संस्थेच्या वतीने १० मान्यवरांचा 'डोंबिवली सन्मान' पुरस्काराने गौरव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : साई श्रद्धा विविध कार्यकारी सेवा संस्था, डोंबिवली यांच्या वतीने श्रीराम नवमी २०२५ निमित्ताने आयोजित करण्यात आलेला पंधरावा वार्षिक उत्सव अत्यंत उत्साही आणि भाविकांच्या सहभागाने पार पडला. यानिमित्त साईबाबांच्या पालखीची भव्य मिरवणूक, साईबाबांचे दर्शन सोहळा तसेच साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमात सर्व महिलांना हळदीकुंकू वाटप करून गुलाब पुष्प देण्यात आले. यावेळी पंचवीस महिला बचत गटांच्या सदस्या आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हजार ते दीड हजार लोकांनी साई महाप्रसादाचा लाभ घेतला.



याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डोंबिवलीकरांचा "डोंबिवली सन्मान" या विशेष पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रासाठी डॉ. अमित लोखंडे, पत्रकारिता क्षेत्रातील आकाश गायकवाड, आरोग्य सेवेसाठी डॉ. सचिन बोंडे, आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वंदना बोरकर, गरजू मुलांना अल्पदरात लस उपलब्ध करून देणारे कल्पेश सावंत, रोजगारनिर्मिती व बांधकाम क्षेत्रातील ज्ञानेश्वर दळवी, सामाजिक कार्यातील एकनाथ म्हात्रे, उद्योग क्षेत्रातील राम आणि लक्ष्मण म्हात्रे बंधू आदी अशा दहा मान्यवरांचा समावेश होता.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार, लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते गुरुनाथ तिरपणकर, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखाधिकारी रश्मी घोडविंदे, घे भरारी लोकसंचालित साधन केंद्राच्या मॅनेजर रोहिणी शिंदे, नवचैतन्य लोकसंचालित साधन केंद्राच्या अंजली परब, बँक ऑफ महाराष्ट्रच्या सविता पावसकर यांची उपस्थिती होती. तसेच डोंबिवलीचे नगरसेवक विकास म्हात्रे, कविता म्हात्रे, प्रकाश भोईर, सरोजिनी भोईर, जनसेवक बाळा म्हात्रे, अनमोल म्हात्रे, शिवसेनेचे हरिश्चंद्र पाटील आणि विलास म्हात्रे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष कैलास सणस, कार्याध्यक्ष प्रवीण साळवी, कार्यकारिणी सदस्य विजय भोईर, उदय सावंत, संघटिका व खजिनदार ज्योती उबाळे, मंगल पांचाळ, मयुरी गायकर, तृप्ती चौव्हाण, अलका सूर्यवंशी, पूजा दुधाळ, कार्यकारी सदस्य प्रकाश उबाळे, संदीप दरेकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# लिटल आर्यनच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांची पर्यावरण जागरूकता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : लिटल आर्यन प्री-के अंबरनाथने त्यांच्या शाळेच्या कॅम्पसमध्ये त्यांचा बहुप्रतिक्षित वार्षिक दिवस साजरा केला. "आश्रय - द ग्रेट कपोक ट्री" या कार्यक्रमाची थीम लिटिल आर्यन प्री-के च्या लहान मुलांनी सुंदरपणे सादर केली होती. सर्जनशीलता आणि मौलिकतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या कार्यक्रमात प्रा. डॉ. दिनेश गुप्ता, भागवत सोनोने फायर ऑफिसर अंबरनाथ नगरपरिषद, गुणवंत पाटील निवृत्त कार्यकारी अभियंता, मलिक डी. डी. जलविभागीय अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.




संस्थापक, आर्यग्लोबल ग्रुप ऑफ स्कूल्स भरत मलिक यांच्या तत्त्वज्ञानानुसार, लिटल आर्यन्सचा वार्षिक दिवस हा पुस्तक-आधारित आहे, सर्जनशीलतेसह शिक्षणाचे मिश्रण आहे. यावर्षी, शाळेने लिन चेरीची "द ग्रेट कपोक ट्री" ही प्रेरणादायी कथा निवडली, जी निसर्गाच्या रक्षणाचे महत्त्व सुंदरपणे सांगते. पर्यावरण चेतनेला चालना देणारी हरित शाळा म्हणून, या चालत्या कथेद्वारे मुलांमध्ये पर्यावरणाबद्दल सहानुभूती आणि प्रेम जागृत करणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

लिटिल आर्यन्सचा वार्षिक दिवस खरोखरच उल्लेखनीय बनला तो म्हणजे 100% सहभागासाठीची वचनबद्धता, प्रत्येक मूल केंद्रस्थानी पोहोचेल याची खात्री करते. संगीत सादरीकरण पूर्णपणे मुलांचे होते तर सर्व गाणी इन-हाउस रचलेली होती आणि मुलांनी स्वतः गायली होती. त्यांच्या मधुर स्वरांनी प्रेक्षागृह आनंदाने आणि अभिमानाने भरून गेले आणि प्रेक्षकांना त्यांच्या प्रतिभेचा विस्मयच झाला.

उपस्थितांना संबोधित करताना प्रा.डॉ. दिनेश गुप्ता यांनी शाळेच्या सर्वांगीण कार्यपद्धतीचे कौतुक केले. "लिटल आर्यनने वार्षिक दिवसाच्या थीममध्ये पर्यावरण शिक्षण विणून खऱ्या अर्थाने निसर्गावरील प्रेम वाढवले आहे. मुलांनी अशा उत्कटतेने आणि मौलिकतेने सादर केलेले पाहणे आनंददायक आहे."असे प्राध्यापक दिनेश गुप्ता यांनी सांगितले. कार्यक्रमाची सांगता भारत मलिक यांच्या हार्दिक संदेशाने झाली, ज्यांनी सर्व सहभागा ग्रूप प्रयत्नांचे कौतुक केले: लहान आर्यांचा वार्षिक दिवस उत्सवापेक्षा अधिक आहे - हा एक शिकण्याचा अनुभव आहे जो मुलांसोबत राहतो. त्यांची मौलिकता आणि निसर्गाशी बांधिलकी प्रेरणादायी आहे."

सर्व उपस्थितांवर कायमचा ठसा उमटवून हा कार्यक्रम जबरदस्त यशस्वी झाला. मूळ संगीत, पुस्तक-आधारित थीम आणि इको-कॉन्शियस व्हॅल्यूजवर लक्ष केंद्रित करून, लिटल आर्यन्सने बालपणीच्या शिक्षणात ते वेगळे का आहे हे पुन्हा एकदा दाखवून दिले.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024